**<u>सह दिवाणी न्यायालय, तथा न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग परंडा यांचे न्यायालयात</u>**

**नि.फौ.ख.क्र. १०८/२०२३.** **निशाणी क्र.१६**

**<u>सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१ ची जबानी</u>**

<u>मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की</u>,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | – | श्री. गणेश संतोष खंकाळ, |
| वय | – | २३ वर्षे, |
| व्यवसाय | – | मजुरी, |
| राहणार | – | समतानगर, झोपडपट्टी, परंडा ता. परंडा जिल्हा उस्मानाबाद. |

**<u>सरतपासणी सहा. सरकारी वकील श्री.व्ही.एस.गायकवाड साहेब यांचे मार्फत</u> –**

मी फिर्यादी सांची बाळासाहेब माकणीकर ओळखतो. मी त्यांचेकडे कामाला होतो. घटनेच्यावेळेस ती १२ मध्ये शिक्षण घेत होती. ती क्लासला जात असताना आरोपी राजु कांबळे परंडा कुर्डुवाडी रोडवर आला व तिचेसोबत फोटो काढला व मी ते पाहिले. आरोपीने काढलेले फोटो दिनांक ११.०९.२०२२ रोजी फेसबुकवर प्रदर्शित केले. प्रदर्शित केलेले फोटो फिर्यादीच्या भावाने पाहिले. तसेच मी सुध्दा पाहिले. आरोपी फिर्यादीवर दबाव आणीत होता, तिच्या घरच्यांना मारीन, तुला तोंड दाखवायला जागा ठेवणार नाही, तुझ्या भावाला मारीन असे म्हणत होता व त्यामुळे फिर्यादीने भितीपोटी घटनेबद्दल सांगितले नव्हते. आरोपी फिर्यादीला त्याच्यासोबत लग्न कर असे म्हणत होता. आरोपी नेहमी फिर्यादीचा पाठलाग करीत होता. घटना ही सन २०२२ मध्ये घडली. मी पोलीसांना घटनेबद्दल जबाब दिला. तो जबाब माझ्या सांगण्याप्रमाणे लिहिला. जबाबातील मजकुर बरोबर आहे.

दिनांक १६.०३.२०२३ रोजी पोलीसांनी मला परंडा कुर्डुवाडी रोड, समतानगर

झोपडपट्टी, सिमेंट रोडवर पंचनाम्याकरीता बोलाविले होते. तिथे विचारपुस केली व फोटो काढले व पंचनामा केला. दुसरा पंच आसिफ शेख हा होता. घटनास्थळ फिर्यादीने दाखविले. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला त्यावर माझी सही आहे. घटनास्थळ पंचनामा तोच आहे. त्यास **निशाणी क्र. १७** देण्यात येते.

**आरोपीचे विधीज्ञांनी दिलेल्या निशाणी क्र. १८ वरील विनंती अर्जानुसार उलटतपास पुढील तारखेपर्यंत न्यायास्तव तहकुब–**

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by DILIP GANGADHAR JAGTAP
Date: 2025.03.20 16:00:41 +0530

( दिलीप गं. जगताप )

दिनांक–२१.०३.२०२५

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, परंडा.